महाराष्ट्र वक्फ बोर्ड,औरंगाबाद लेखापरीक्षण अहवाल सन 2015-2016

जा.क्र.स्था-18/ब/ले.प.अ./मरावमंऔ/ 2015-16/ 561

--// कार्यालय //--
सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद .
दिनांक : 26.6.23

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
छत्रपती संभाजीनगर
आवक साखा क्र. 8057
शाखा Audit
दिनांक. 21 JUL 2025
स्थापना अधि. उप.मु.का.अ.

प्रेषक,

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद.

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र वक्फ बोर्ड,औरंगाबाद.

महोदय,

महाराष्ट्र वक्फ बोर्ड, औरंगाबाद चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्रीमती पी.एस.धींगाने, सहायक संचालक (प्र.), श्री.डी.एन.सपकाळ, वरिष्ठ लेखापरिक्षक तसेच श्री.आर.डी.जाधव, श्रीमती एस.आर. राखेवार, श्रीमती जे.आर. अहिरे कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांनी दिनांक 02.02.2023 ते दिनांक 23.02.2023 या कालावधीत पूर्ण केले.

श्री. गो.आ. गंडे, लेखा परीक्षा अधिकारी,स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद यांनी दि. 8.6.23 रोजी पुनर्विलोकन केले व श्री डी. बी. पाटील, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांनी दिनांक 23.6.23रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेशी चर्चा केली व अहवालाचे अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी पदावर कार्यरत होते.

पदाधिकारी / अधिकारी यांचे नाव	पदनाम	पासून	पर्यंत
श्री. एम. एन. शेख	अध्यक्ष	01.04.2015	31.03.2016
श्री. सय्यद ईजाज हुसेन	मुख्य कार्यकारी अधिकारी	01.04.2015	31.07.2015
श्रीमती नसिन बानो नजीर पटेल	मुख्य कार्यकारी अधिकारी	02.09.2015	31.03.2016

पुनर्विलोकन केले.

चर्चा केली.

लेखा परिक्षा अधिकारी
स्थानिक निधी लेखापरीक्षा
औरंगाबाद.

मुख्यकार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
औरंगाबाद.

सहायक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
औरंगाबाद.

8057

1	अंदाजपत्रकीय तरतुद व कमी अधिक खर्चाबाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	वक्फ फंड	9अ	7	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

मुत्तवल्लीने असे अंदाजपत्रक मंडळास सादर केल्याचे दिसून आले नाही. प्रत्येक वर्षी मंडळाने पुढील आर्थिक वर्षासाठी त्या आर्थिक वर्षातील अपेक्षीत जमा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावयास हवे आणि त्याची एक प्रत राज्य सरकारला पाठवावयास हवी अशी तरतूद असताना मंडळाने सदर अंदाजपत्रक राज्य शासनाला पाठविलेबाबत दिसून आले नाही. लेखापरीक्षणामध्ये सादर करंण्यात आलेले अंदाजपत्रक मंडळाने मंजुर केलेबाबत ठराव तसेच मंडळाने अंदाजपत्रक मंजूर केलेबाबत दिसून आले नाही. सन 2015-2016 मध्ये ऑडिट फीस साठी रु.5.00 लक्ष ची तरतुद असताना प्रत्यक्ष खर्च रु.3.00 लक्ष एवढा खर्च केला आहे. तेव्हा रुपये 2.00 लक्ष इतका खर्च अंदाजतपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्तीचा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच Honorarium या सदराखाली रु.108000/- एवढी तरतुद असताना लेखापरीक्षणास सादर केलेल्या खर्चाच्या अहवालात रु.153953/- एवढा खर्च दर्शविला आहे. वक्फ फंड Construction & Repairs या सदराखाली अंदाजत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.7890/- एवढा खर्च नोंदविला आहे. तसेच Hospitality Charges या सदराखाली अंदाजपत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.27442/- एवढा खर्च नोंदविला आहे. इन्स्टीटयुशन फंड या निधीअंतर्गत खर्चाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष केलेल्या कमी/अधिक खर्चाबाबत वक्फ मंडळाने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेतलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना उपलब्ध केलेल्या अंदाजपत्रकाची व जमा खर्च विवरणपत्राची पडताळणी केली असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या -

1.वक्फ अधिनियम 1995 चे कलम 44 (1) नुसार प्रत्येक मुत्तवल्लीने, प्रत्येक वर्षी ज्याप्रकारे नमूद केलेले असेल त्याप्रमाणे आणि त्या पध्दतीनुसार पुढील आर्थिक वर्षात अंदाजपत्रक तयार करावयास हवे, त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये अंदाजीत जमा आणि खर्च दाखवावयास हवे. तसेच कलम 44(2) अन्वये अशा प्रकारचे अंदाजपत्रक हे प्रत्येक मुत्तवल्लीने आर्थिक वर्ष सुरु होण्याच्या आधी किमान 30 दिवसांपूर्वी मंडळास सादर करावयास हवे, असे असताना मुत्तवल्लीने असे अंदाजपत्रक मंडळास सादर केल्याचे दिसून आले नाही.

2. वक्फ अधिनियम 1995 चे कलम 78(1) अन्वये ठरवून दिलेल्या आणि ठरवून दिलेल्या अशा समयी प्रत्येक वर्षी मंडळाने पुढील आर्थिक वर्षासाठी त्या आर्थिक वर्षातील अपेक्षीत जमा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावयास हवे आणि त्याची एक प्रत राज्य सरकारला पाठवावयास हवी अशी तरतूद असताना मंडळाने सदर अंदाजपत्रक राज्य शासनाला पाठविलेबाबत दिसून आले नाही.

3.वक्फ अधिनियम 1995 चे कलम 78(3) अन्वये राज्य शासनाकडून सुचना मिळाल्यानंतर राज्य शासनाने सुचविलेले फेरफार, दुरुस्ती किंवा बदलाबददल मंडळ शासनास लेखी विनंती करु शकेल आणि राज्य शासन त्या निवेदनाचा विचार करुन तो मिळाल्यापासून 3 आठवडयाचे आत त्या प्रकरणासंदर्भात आपल अंतिम निर्णय मंडळास कळविल, आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम राहिल. तसेच कलम 78 (4) नुसार उपलकलम अंतर्गत राज्यशासनाचा निर्णय मिळाल्यानंतर राज्य शासनाकडून अंतिमपणे सुचविण्यात आलेले फेरफार, दुरुस्ती, बदलांचा आपल्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करावयास पाहिजे आणि अशाप्रकारे फेरफार दुरस्त किंवा बदल करण्यात आलेले अंदाजपत्रक हे अंदाजपत्रक राहिल, ते मंडळादवारे मंजूर केले पाहिजे अशी तरतुद असताना लेखापरीक्षणामध्ये सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक मंडळाने मंजुर केलेबाबत ठराव तसेच मंडळाने अंदाजपत्रक मंजूर केलेबाबत

दिसून आले नाही. तेव्हा मंडळाच्या संमतीशिवाय मंजूर केलेले अंदाजपत्रक नियमबाहय आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4. अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2015-2016 मध्ये ऑडिट फीस साठी रु.5.00 लक्ष ची तरतुद असताना प्रत्यक्ष खर्च रु.3.00 लक्ष एवढा खर्च केला आहे. तेव्हा रुपये 2.00 लक्ष इतका खर्च अंदाजतपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्तीचा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच Honorarium या सदराखाली रु.108000/- एवढी तरतुद असताना लेखापरीक्षणास सादर केलेल्या खर्चाच्या अहवालात रु.153953/- एवढा खर्च दर्शविला आहे. तरी मंजूर तरतुदीपेक्षा जास्तीचा केलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. सदरबाबत मंजूरी घेवून दर्शवावे.

5. अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2015-2016 मध्ये वक्फ फंड Construction & Repairs या सदराखाली अंदाजत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.7890/- एवढा खर्च नोंदविला आहे. तसेच Hospitality Charges या सदराखाली अंदाजपत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.27442/- एवढा खर्च नोंदविला आहे. तरी तरतुदीशिवाय केलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. सदरबाबत मंजूरी घेवून दर्शवावे.

6. इन्स्टीटयुशन फंड या निधीअंतर्गत सन 2015-2016 मध्ये रु.15624834/- एवढा खर्च केलेला आहे. परंतु सदर खर्चाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदरचा खर्च हा मंजुर अंदाजपत्रकानुसारच झाल्याबाबतची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

7.अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष केलेल्या कमी/अधिक खर्चाबाबत वक्फ मंडळाने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेतलेली नाही.

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
1	06/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATDNSM7101

02	बँक ताळमेळाबाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
00	00				
शाखा संकेतांक	लेखाशीर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
00	00	00	9 अ	02	00

आक्षेपाधीन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
00	00	00	00

बँक ताळमेळ घेतलेला नाही.

महाराष्ट्र राज्य, वक्फ बोर्ड, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात दिनांक 31.3.2016 अखेरची रोखवही व बँक विवरणपत्राच्या शिल्लकेची तपासणी केली असता खालीलप्रमाणे रक्कमा आढळून आलेल्या आहे.

अ.क्र.	रोखवहीचे प्रकार	खाते क्रमांक	रोखवहीनुसार दिनांक 31-3-2016 रोजीची अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रानुसार दिनांक-31-3-2016 रोजीची अखेरची शिल्लक	फरक / तफावत
1	2	3	4	5	6
1.	वक्फ फंड	52071931474	3,81,47,034	3,82,95,177	1,48,143
2.	Institutional fund	52071931463	36,070	18,807	-17,263
3.	बँक गुंतवणूक	SBH व BMC	9,80,68,377	9,80,68,377	निरंक
		एकूण =	13,62,51,481/-	13,63,82,361/-	1,30,880/-

वरील दिलेल्या विवरणपत्राप्रमाणे दिनांक 31.03.2016 अखेर रोखवही व बँक स्टेटमेंटमध्ये तफावत आढळून आली आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 अन्वये प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोखवही व बँक पासबुक यामधील रकमांचा ताळमेळ घेवून फरक निरंक करणे आवश्यक आहे, तथापि कार्यालयाने नियमीत बँक ताळमेळ घेतला नसल्याने दिसून येते.

त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात

1. Waqf fund खात्यामध्ये रोखवहीत रुपये 3,81,47,034/- शिल्लक असून बँक खात्यामध्ये रुपये 3,82,95,177/- एवढी शिल्लक आहे. दोघामधील रुपये 148143/- चा फरक आहे. याबाबत ताळमेळ घेवून न वटलेल्या धनादेशाची यादी दर्शवून फरक निरंक करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

2.Institutional fund खात्यात दिनांक 31.3.2016 रोजी रोखवहीमध्ये रुपये 36070/-अखेर शिल्लक असून बँकेमध्ये अखेरची शिल्लक रुपये 18807/- एवढी आहे. दोघामधील फरक रुपये -17263/- आहे. त्यामुळे कार्यालयाने अदा केलेले व रदद केलेले,न वटलेल्या धनादेशाची यादी तयार करुन काही धनादेश तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे असल्यास ते रद्द करुन रक्कम पुन्हा रोखवहीमध्ये जमा घेवून ताळमेळ घालून अनुपालन अहवाल सादर करावा.

अर्धसमास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेप. वर्षपासून (yyyy-yyyy+1)	लेप .वर्षापर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
01	06/02/2023	2015-16	2015-16	00

लेखापरीक्षकाचा संकेतांक	DATDNSM7101

03	संगणकाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीवर केलेल्या खर्चाबाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	वक्फ़ फंड	9अ	1	42176

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
42176	0	0	0

सदर विभागात किती संगणक चालु होते याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही .सदर पुरवठादाराने किती भेटी दिल्या व किती संगणकाची तपासणी ,संगणक साहित्य खरेदी , दुरुस्ती केली याबाबत दस्तऐवजाची मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना संगणक साहित्य खरेदी व दुरुस्तीवर खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल A M C प्रदान
1	05	20.04.15	22785	03 टॅन आय.बी.एम.खरेदी
2	09	02.05.15	3503	टोनर खरेदी –सिया इंटरप्रायजेस
3	13	02.05.15	1000	दुरुस्ती
4	40	16.06.15	14888	ड्रम खरेदी - सिया इंटरप्रायजेस
		एकूण	42176	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.वरील प्रमाणकांन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या विभागातील संगणकाची देखभाल दुरुस्तीवर रु. 42176/- एवढा खर्च नोंदविला आहे. सदर विभागात किती संगणक चालु होते याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. सदर पुरवठादाराने किती भेटी दिल्या व किती संगणकाची तपासणी, दुरुस्ती केली याबाबत दस्तऐवजाची मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कार्यालयात किती संगणक होते व किती संगणकाची ए एम सी करण्यात आली होती याची खात्री करता आली नाही.

अर्धसमास पत्राचा तपशिल खालीलप्रमाणे -

1) अर्धसमासपत्र 2 दिनांक 13/02/2023

2) अर्धसमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
04	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATSRRF8801

04	विमान प्रवासावर नोंदविलेल्या खर्चाबाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	वक्फ फंड	9अ	03	54613

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
54613	0	0	0

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च 2010 मधील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (अ) नुसार सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही तसेच परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने / मार्गाने (पत्र मिळाल्यानंतर) वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येईल, मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणा-या विमान कंपन्यांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही, असे असतानासुध्दा नियमबाहयरीत्या परतीचा विमान प्रवास केला आहे. सदर प्रवासाबाबत कोणतीही पूर्वपरवानगी घेतल्याचे देयकासोबत दिसून आले नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना विमान प्रवासावर खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल	विमान प्रवास
1	04	16.04.2015	13878	श्री.सय्यद अजीज	औरंगाबाद ते दिल्ली विमान प्रवास
2	75	08.07.2015	13081	श्री.सय्यद अजीज	औरंगाबाद ते मुंबई आणी दिल्ली ते पुणे विमान प्रवास
3	93	30.07.2015	9462	श्री.सय्यद अजीज	मुंबई ते दिल्ली विमान प्रवास
4	136	27.11.2015	18192	श्री.सय्यद अजीज	पुणे ते दिल्ली व दिल्ली ते पुणे विमान प्रवास
		एकूण	54613		

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च 2010 मधील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (अ) नुसार सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही तसेच परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने / मार्गाने (पत्र मिळाल्यानंतर) वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येईल, मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणा-या विमान कंपन्यांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) उपरोक्त नमुद शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही, असे असतानासुध्दा नियमबाहयरीत्या परतीचा विमान प्रवास केला आहे.

3) सदर प्रवासाबाबत कोणतीही पूर्वपरवानगी घेतल्याचे देयकासोबत दिसून आले नाही. तसेच कार्योत्तर मंजुरीही देयकासोबत दिसून आली नाही. तेव्हा मंजुरीविना केलेला प्रवास तसेच मंजुरीविना पारीत केलेले देयक लेखा मान्य करता येत नाही.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
04	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATDNSM7101

05	गुंतवणुककीची/ ठेवीची नोंदवही बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	ई फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

अधिनियम 1995 चे नियम 36 (1) नुसार नमुना ब ई-5 मध्ये विभागाने गुंतवणुंक नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना गुंतवणुंक नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 36 (1) नमुना ब ई-5 विभागाने या नमुण्यात गुंतवणुंक नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2015-2016या वित्तीय वर्षात (सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार) खालील प्रमाणे मुदत ठेवी ठेवण्यात आल्या आहेत.

वक्फ फंड -

Receipt No.	Deposit Date	Deposit Amount	Name of Bank
975516	10.10.2015	4754742	State Bank Of Hydrabad
393950	01.06.2015	8593563	State Bank Of Hydrabad
888058	16.06.2015	8121322	State Bank Of Hydrabad
868157	25.06.2015	65598750	State Bank Of Hydrabad
28206	19.01.2016	1100000/-	बॉम्बे मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँक गुंतवणूक केली.
	Total	87068377	

इन्स्टिटयशन फंड-

Receipt No.	Deposit Date	Deposit Amount	Name of Bank
0911882	29.09.2015	6000000	Indian Bank
818051	10.10.2015	4349844	State Bank Of Hydrabad
393951	18.04.2015	1432543	Indian Bank
28177	01.06.2015	8593563	State Bank Of Hydrabad
818766	08.12.2015	6000000	बॉम्बे मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँक गुंतवणूक केली.
818766	01.01.2016	7812601	State Bank Of Hydrabad
	Total	34188551	

मागील वर्षात कीती मुदत ठेवी होत्या ? त्यावर जास्तीत जास्त कीती व्याज मिळाले ? जात्तीत जास्त व्याज मिळण्यासाठी बॅकेसोबत वाटाघाटी केल्याबाबत कोणताही तपशील लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाला नाही याबाबत अर्धसमास पत्र देवुनसुध्दा सदरचा तपशिल

लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. पुर्तता करुण अनुपालन सादर करावे. अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023 अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023 अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATSRRF8801

06	जंगम मालमत्ता नोंदवही बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	ई फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(5) विभागाने या नमुण्यात जंगम मालमतता नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना जंगम मालमतता लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(5) विभागाने या नमुण्यात जंगम मालमत्ता नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे जंगम मालमत्ता नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा जंगम मालमत्ता नोंदवही उपल्बध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील जंगम मालमत्तेची पडताळणी करता आली नाही. पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATRDJM7801

07	स्थावर मिळकतीची नोंदवही बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	ई फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(4) विभागाने या नमुण्यात स्थावर मीळकतीची नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना स्थावर मीळकतीची नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.
.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(4) विभागाने या नमुण्यात स्थावर मीळकतीची नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे स्थावर मीळकतीची नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा स्थावर मीळकतीची नोंदवही उपल्ब्ध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील स्थावर मीळकतीची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATJRAF8101

08	भाडे पटटा/ गहाण नोंदवही बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(7) विभागाने या नमुण्यात भाडे पटटा/ गहान नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना भाडे पटटा/ गहान नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.
.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(7) विभागाने या नमुण्यात भाडे पटटा/ गहान नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे स्थावर भाडे पटटा/ गहान नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा भाडे पटटा/ गहान नोंदवही उपल्ब्ध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील भाडे पटटा/ गहान बाबतची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATSRRF8801

09	भाडे नोंदवही बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियमा 12 (1) नमुना (8) विभागाने या नमुण्यात भाडे नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना भाडे बाबत अभीलेखे लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.
.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना (8) विभागाने या नमुण्यात भाडे नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे स्थावर भाडे नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा भाडे नोंदवही उपल्ब्ध झाली नाही. त्यामुळे वक्फ मंडळाकडील भाडे बाबतची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATRDJM7801

10	न्यालयीन नोंदवही (वादाचा तपशील) बाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(14) विभागाने या नमुण्यात न्यालयीन नोंदवही (वादाचा तपशील) ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना न्यायालयीन नोंदवही (वादाचा तपशील) नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाहीं यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.
.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(7) विभागाने या नमुण्यात न्यालयीन नोंदवही (वादाचा तपशील) ठेवणे आवश्यक आहे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे न्यायालयीन नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा न्यालयीन नोंदवही (वादाचा तपशील) उपल्ब्ध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील न्यायालयीन कीती प्रकरणे आहे या बाबतची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATJRAF8101

11	वक्फ बोर्ड सन 2015-2016 मध्ये भोडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमत्तांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस उपलब्ध न झाले बाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना(7) (8) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2015-2016 मध्ये भाडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमत्तांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस उपलब्ध न झाले बाबत.

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना(7) (8) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2015-2016 मध्ये भाडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमततांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस सादर केले नाही त्यामुळे बोर्डाकडे किती मालमत्ता आहे तसेच मालमत्ता भाडेतत्वावर/लीजवर देतांना मंडळाची मुजुरी घेवुनच दिल्या किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. तसेच त्याच्याकडुन मुदांक पेपरवर करार नामा केला कींवा कसे याबाबत अर्धसमास पत्र देवुन सुधा उपल्बध झाले त्यामुळे मालमत्ता धारकाकडे किती थकबाकी आहे किती रक्कम वसुल केली याची पडताळणी करता आली नाही.
उपरोक्त बाबीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 1 दिनांक 06/02/2023
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATRDJM7801

12	वक्फ बोर्ड सन 2015-2016 मध्ये स्थावर मालमत्तेचा लीलावाबाबत				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	0

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 18(32) नमुना(झेड) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2015-2016 स्थावर मालमत्तेचा लीलावाबाबत संचीका लेखापरीक्षणस उपब्ध न झाले बाबत.

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 18(32) नमुना(झेड) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2015-2016स्थावर मालमत्तेचा लीलावाबाबत संचीका लेखापरीक्षणस उपब्ध झाले नाही त्यामुळे सन 2015-2016 मध्ये कीती मालमत्तेचे लीलाव झाले सदर लीलाव हे वित्तीय वर्षाच्या बाजार भावाप्रमाणेच झाले कींवा कसे याची पडताळणी करता आली नाही तसेच मालमत्तेच्या लीलावाची रक्कम मालमत्ता धारकाकडुन पुर्ण वसुल झाली कींवा कसे याची पडताळणी करता आली नाही.या बाबत अर्धसमास पत्र देवुन सुधा सदर संचीका उपल्बध झाली नाही.
उपरोक्त बाबीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 1 दिनांक 06/02/2023
अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 3 दिनांक 13/02/2023
अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATDNSM7101

13	वकील फी /लीजीटेशन फी बाबतची खर्च प्रमाणकांशी संबंधीत अभिलेखे व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास इत्यादी अभिलेखे व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	व फंड	9अ	1	5260880

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
5260880	0	0	0

वकील फी /लीजीटेशन फी बाबतची खर्च प्रमाणकांशी संबंधीत अभिलेखे व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास इत्यादी अभिलेखे व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

वक्फ बोर्ड सन 2015-2016 या वर्षाचे लेखापरीक्षणात खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे प्रमाणकांशी संबंधीत वकील फी /लीजीटेशन फी बाबतची खर्च प्रमाणकांशी संबंधीत अभिलेखे व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून उपब्ध झाले नाही. त्यामुळे मंडळात एकूण वित्तीय वर्षात किती न्यायालयीन प्रकरणे चालू होती व ती कोणत्या प्रकारची होती व न्यायालयीन प्रकरणाबाबत वकीलास देण्यात आलेल्या रकमा कोणत्या दराप्रमाणे देण्यात आले तसेच कमीटीने ठरविलेल्या दराबाबत लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे तसेच महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाकस 1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 अन्वये सदर केलेली कार्यवाही ही शासन निर्णय तरतुदीप्रमाणेच झाल्याची खात्री करता आली नाही. खर्च प्रमाणकांचा तपशिल खालीलप्रमाणे -

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक/ दिनांक	रक्कम	तपशिल
1	67/25.06.15	86000	ॲड पटेल समीर
2	68/25.06.15	13500	ॲड पटेल समीर
3	69/25.06.15	42500	ॲड पटेल समीर
4	70/25.06.15	29000	ॲड सय्यद कलीम
5	71/25.06.15	11000	ॲड सय्यद अली
6	108/31.07.15	80000	-
7	114/22.9.15	25000	ॲड पटेल समीर
8	133/02.11.15	550000	ॲड सुलेमान खुर्शीद
9	176/14.01.16	33000	ॲड सय्यद कलीम
10	177/15.1.16	25000	ॲड सय्यद कलीम
11	178/15.01.16	25000	ॲड सय्यद कलीम
		920000	

या बाबत खालीलप्रमाणे अर्धसमास पत्र देवुन सुद्धा सदर अभिलेखे उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे झालेला खर्च नियमानुसार झालेबाबत खात्री करता आली नाही.

अर्धसमास पत्राचा तपशिल खालीलप्रमाणे -

अर्धमासपत्र 2 दिनांक 13/02/2023

14	वसुलीच्या रकमा विलंबाने बँकेत भरणा करणे बाबत.				
योजना संकेतांक	योजनेचे नाव				
0	0				
शाखा संकेतांक	लेखा शिर्ष	निधीचा स्रोत	कलम	अनियमिततांची संख्या	गुंतलेली रक्कम
0	0	वक्फ फंड	9अ	01	

आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
0	0	0	0

वक्फ मंडळाच्या मालमत्तेचे भाडे, विविध शुल्कांच्या वसुल केलेल्या रोख रकमा वसुली लिपीकांनी विलंबाने बँकेत भरणा केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता वक्फ मंडळाच्या मालमत्तेचे भाडे, विविध शुल्कांच्या वसुल केलेल्या रोख रकमा वसुली लिपीकांनी विलंबाने बँकेत भरणा केल्याचे दिसून येते. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

जिल्हा कार्यालय औरंगाबाद :-

अ.क्र.	पावती क्रमांक	दिनांक	रक्कम	बँकेत भरणा दिनांक	विलंब (दिवसांत)
1	80473-80474	12/10/15	13250	17/10/15	05
2	80478-80479	26/10/15	7650	31/10/15	05
3	80482	04/11/15	5000	16/11/15	12
4	85349, 85351	11/03/16, 14/03/16	11000,2000	18/03/16	07,05
5	85353	21/03/16	9000	30/03/16	09
6	85352	21/03/16	3057	30/03/16	08
7	85469-85470	22/03/16	2000,10000	30/03/16	07
8	85468	19/03/16	2000	30/03/16	11

जिल्हा कार्यालय नाशिक :-

अ.क्र.	पावती क्रमांक	दिनांक	रक्कम	बँकेत भरणा दिनांक	विलंब (दिवसांत)
1	83685	17.03.16	820	28/03/16	11
2	83686	23.03.16	690	28/03/16	05

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.वरीलप्रमाणे वेगवेगळया प्रकारे वसुल करण्यात आलेल्या रकमा वसुल झाल्यानंतर 3 दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक असताना सदर रक्कम बँकेत उशीरा भरण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा सादर करावा.

अर्धमासपत्र 4 दिनांक 20/02/2023 उपरोक्त बाबीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.				
अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATJRAF8101

अर्ध समास ज्ञापन क्र	दिनांक (dd/mm/yyyy)	लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1(	लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1)	कार्यालय संकेतांक
4	20/02/2023	2015-2016	2015-2016	0

लेखापरीक्षकाचासंकेतांक	DATSRRF8801

वक्फ बोर्ड,औरंगाबाद सन 2015-16

किरकोळ परिच्छेद :-

लेखापरीक्षण कालावधीत किरकोळ स्वरूपाच्या आक्षेपांची पूर्तता केल्यामुळे किरकोळ स्वरूपाचे आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आले नाही.

उत्तरे:

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम-1930 चे कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचे दिनांकापासून चार महिन्याचे आत लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन अहवाल वक्फ बोर्डाच्या ठरावाच्या प्रतीसह मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांचे स्वाक्षरीने सहायक संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद या कार्यालयात पाठवावा.

पोच: सदरील लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याबाबतची दिनांकित पोच या कार्यालयास देण्यात यावी.

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद.

जा.क्र.स्था.18/ब/लेपअ/वक्फ बोर्ड./2015-16/561 दिनांक 26/06/2023

१.मा.प्रधान सचिव,अल्पसंख्याक विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र शासन,मुंबई
२.मा.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,नागपूर-2
३.मा.प्रधान सचिव,(वित्तीय सुधारणा) वित्त विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र शासन,मुंबई
४.मा,विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.
५.मा.संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,संचालनालय,महाराष्ट्र राज्य,रायगडभवन, नवी मुंबई.
६.मा.सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.
७.मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,औरंगाबाद जिल्हा :- औरंगाबाद.
८.पुनर्विलोकन शाखा,मुंबई कार्यालय,मुंबई.
९.पुनर्विलोकन शाखा,औरंगाबाद कार्यालय,औरंगाबाद.
१०.पुनर्विलोकन शाखा,प्रस्तुत कार्यालय,
११.डी.संचिका
१२.जादा प्रत

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद.